ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

ऐतिहासिक पर्यटन : विशेष संदर्भ गडहिंग्लज तालुका

डॉ.सुरेश मारुती चव्हाण
इतिहास विभाग प्रमुख, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज (महाराष्ट्र)

प्रस्तावना -

इतिहास आणि पर्यटन यांचा अत्यंत जवळचा संबध असतो. तथापि त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. कारण No Documents no History या तत्वानुसार वाटचालकरणाऱ्या इतिहासामूधनच पर्यटनाचा जन्म होतो. ऐतिहासिक पर्याटनचा विचार करत असताना गडहिंग्लज तालुक्याला विशेष महत्त्व आहे.आंबोलीच्या जंगलात उगम पावनाऱ्या हिरण्यकेशी नदिच्या काठावर ही छोटी व सुंदर नगरी वसलेली आहे. पराक्रम ,पर्यावरण, निसर्ग याचबरोबर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, परीवर्तनाचा समृध्द वारसा हे या नगरीचे खास वैशिष्टये होय. तिला प्रतापराव गुर्जर यांच्या महान पराक्रमाची, जगविख्यात शिक्षणतज्ञ ,डॉ.जे.पी.नाईक,स्वामीकार रणजित देसाई ,शिवाजी सावंत व राजन गवस इत्यादीच्या कार्यकर्तृत्वाची, १३० वर्षे पूर्ण करणाऱ्या पुज्य सानेगुरुजी वाचनालयाची, देवदासीप्रथेच्या निर्मूलन कार्याची आणि भारताच्या स्वातंत्र चळवळतील प्रत्यक्ष सहभागाची उज्वल परंपरा लाभली आहे. विविध ऐतिहासिक वैशिष्टयांमुळे गडहिंग्लजचा परीसर ऐतिहासकि पर्यटनाचे केंद्र म्हणून विकसित झाले आहे. अलुत पराक्रमाने नेसरीची खिंड पावन करणाऱ्या सरसेनापती प्रतापराव गुर्जर यांचे स्मारक, शेकडो आक्रमणे छाताडावर झेलून नगरीचे संरक्षण करणारा सामनगड, महाराष्ट्र,कर्नाटक, गोवा परीसरातील लाखो लोकांचे आराध्य दैवत श्री. काळभैरी देवस्थान, इंचनाळचे पेशवेकालीन, गणेश मंदिर,परिसराचे विलोभनीय दर्शन घडवून देणारा गुडडाई डोंगर व परकीय सत्तेच्या गुलामगिरीतून मातृभूमीची सुटका करण्यासाठी सुरु झालेल्या स्वातंत्रय चळवळीत २७ क्रांतीकारकांच्या सहभागाने इतिहास घडवणारे नूल, ही गडहिंग्लजच्या पर्यटनाची चालती बोलती उदाहरणे आहेत. त्यांचा संक्षिप्त आढावा घेत असतानाच संवर्धनाची वेदनाही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

गडहिंग्लजचा पूर्वइतिहास :

संकेश्वर ,कागल,गारगोटी, आजरा, भुदरगड आणि चंदगड यांच्या मध्यभागी वसलेला एक प्रगतशील तालुका म्हणजेच गडहिंग्लज होय. भौगोलिककृष्टया विचार करता गडहिंग्लजच्या पूर्वेला संकेश्वर, पश्चिमेला आजरा-गारगोटी दरम्यानचा भूप्रदेश, दक्षिणेला हिरण्यकेशी नदी आणि उत्तरेला ग्रामदैवत श्री काळभैरीचे जागृत देवस्थान आहे. गडहिंग्लजच्या निर्मिती व नावाबद्दल अनेक अख्यायिका सांगितल्या जातात. जसे की,ज्याच्या छताखाली हे शहर वसले आहे तो सामानगड जेव्हा प्रथम जिंकला गेल तेव्हा लोकांनी गड जिंकला.... गड जिंकला... अशा आनंदाने आरोळया दिल्या. त्यातूनच गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या गावाला गडहिंग्लज असे नाव मिळाले. दुसरी अख्यायिका अशी सांगितली जाते की, 'चिकोडी तालुक्यातील 'इंग्लज' याच्यापासून वेगगेळपण दाखविण्यासाठी गडाच्या सान्निध्यामध्ये येथील 'इंग्लज ' ला गडहिंग्लज (गडइंग्लज) तर चिकोडी तालुक्यातील 'इंग्लजला' 'नाइंग्लज' असे नाव देण्यात आले.' तर काहींच्या मते, 'गुड्डाईदेवीच्या सानिध्यामुळे या गावास गुड्हिंग्लज असे म्हणत असत. त्याचाच पुढे अपभ्रंश गडहिंग्लज असा झाला. एकूणच गडहिंग्लजच्या नावाबाबत विचार करता सामानगडाच्या कुशीत हे गाव वसले असल्यामुळे याचे नाव गडहिंग्लज असे पडले असावे याबाबत अनेक अभ्यासकांचे एकमत असलेले दिसून येते[१].

गडहिंग्लजच्या निर्मितीसंदर्भात असे मानले जाते की,पूर्वीचे गडहिंग्लज हे हाळलक्ष्मी परिसरात वसले होते. पण पाण्याच्या सोयीसाठी पुढे ते नदीकाठावर सरकले. पुढे निपाणीकर -पटवर्धनांच्या अनेक स्वाऱ्यांचा त्रास गडहिंग्लजकरांना सोसावा लागला होता. सुमारे ४०० वर्षापूर्वीचा गडहिंगलजमध्येही एक किल्ला असून तो कापशीच्या घोरपडे घराण्यातील एका पराक्रमी पुरूषाने बांधला होता. त्याच्या सभोवताली असणाऱ्या खंदकाचे काही भाग आजही जुन्या वसाहतीती असल्याचे मानले जाते. इ.स. १८५४ पर्यंत तालुक्यातचे ठिकाण सामानगडावर तर कचेरीचे ठिकाण कडगांव येथे होते. पण १८५४ साली तालुक्यातचे ठिकाण व कचेरी गडहिंगलज हलविण्यात आली.[२]

गडहिंग्लज तालुक्यातील ऐतिहासिक पर्यटनस्थळे

१) भाविकांचे श्रदधास्थान असणारे श्री.काळभैरव मंदिर

या परिसराचे ग्रामदैवत आणि लाखो भविकांचे श्रध्दास्थान असणाऱ्या श्री काळभैरव देवस्थानाल एक आगळे-वेगळे महत्त्व आहे. गडहिंग्लज नगरीच्या उत्तरेला सुमारे ५ कि.मी–अंतरावरील डोंगराच्या कुशीत हे मंदिर वसलेले आहे. मंदिराच्या स्थापनेबाबतचा ठोस पुरावा नसला तरी निपाणीचे आप्पासाहेब निपाणीकर यांनी या मंदिरास भेट दिल्याची नोंद मिळते. यावरून हे मंदिर सुमारे ३५० ते ४०० वर्षापूर्वीचे असावे असे वाटते. दक्षिणाभिमुख असणाऱ्या मंदिरात श्री. काळभैरवाच्या मूर्तीबरोबरच बाळभैरव,जोगेश्वरी, महाकली, महादेव यांच्याही मूर्त्या पहावाय मिळतात. डोंगर -कपारीतून बारमाई जिवंत असणाऱ्या झऱ्यातून पाणी येते हे येथील खास वैशिष्टये होय. सभोवतालचा परिसर अत्यंत विलोभनीय व मन प्रसन्न करून टाकणारा असा आहे. काळभैरवाच्या अनेक आख्ययायिका सांगितल्या जातात. पैकी काळभैरवाची एक पौराणिक कथा अशी की,पूर्वी ब्रम्ह आणि विष्णू यांना महामायेने मोहिनी घातली. त्यांच्यात अहंकार निर्माण झाला. तेव्हा ते दोघे न्याय मागण्यासाठी शंकराकडे गेले. शंकराने त्यांचा न्यायनिवाडा केला पण ब्रम्हदेव खोटे बोलेले म्हणून श्री काळभैरवाने ब्रम्हदेवाच्या पाच शीरांपैकी एक शीर आपल्या डाव्या हाताच्या नखग्राने तोडली. त्यामुळे श्री काळभैरवाच्या पाठीशी ब्रम्हात्या लगाली. म्हणून त्याने तीर्थयात्रा करण्यास सुरूवात केली. सर्व तीर्थे करून तो काशीला आला. तेथील स्थान करताच त्याच्या नखाग्राला चिकटलेले ब्रम्हदेवाचे शीर गळून पडले. त्याची ब्रम्हहत्या नाहीशी झाली. तेव्हापासून तो कशीला राहू लागला. म्हणूनच त्याला महादेवाचा पाचवा अवतार काशी विश्वेश्वर श्री काळभैरव असे नाव पडले.[२] ही आख्यायिका इतिहासाला धरून नसली तरी मागच्या पिढीतून विद्यमान पिढीकडे दंतकथेच्या माध्यमातून चालत आलेला वारसा आहे. तो मानायचा की नाही याचे प्रत्येकाला स्वातंत्र आहे. असो... या काळभैरव मंदिराच्या पूजाअर्चेचे काम गडहिंग्लज मधील गुरव कुटुंबाकडे पूर्वीपासूनच आहे. प्रत्येक वर्षी फेब्रुवारी महिन्यात श्री. काळभैरवाची मोठी यात्रा भरते. महाराष्ट्र व कर्नाटक बरोबरच सभोवताच्या परिसरातून सुमारे ३-४ लाख भाविक अत्यंत प्रसन्न मनाने यात्रेत सहभागी होतात. नवसाला पावणारा काळभैरव अशी भाविकांची श्रध्दा असल्याने यावेळी कामानिमित्य बाहेरगावी गेलेली पाहुणेमंडळी आवर्जुन हजेरी लावतात. मुख्य यात्रेच्या आदल्या दिवशी गडहिंग्लज येथील काळभैरव मंदिरातून दुपारी पालखीच्या भव्य मिरवणुकीला सुरूवात होवून रात्री ११ वाजेपर्यंत पालखीचे भैरीच्या डोंगरावा आगमन (वाजतगाजत) होते. या मिरवणुकीतही लाखो भाविक आनंदाने सहभागी होतात. यात्रेच्या दिवशी कोटयावधींची आर्थिक उलाढाल होते. यात्रेशिवायही वर्षभर भाविकांची सतत वर्दळ असते.[४]

२) सरसेनापती प्रतापराव गुर्जर यांचे स्मारक

छत्रपती शिवरायांच्या ज्या रणझुंजार सेनापती आपल्या विलक्षण स्वाभीमानाने पराक्रमाची शर्थ करून आपल्यावरील भिरूतेचा कलंक पुसून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे. अशा या सरसेनापती प्रतापराव गुर्जरांची समाधी याच परिसरात असून तिला 'नेसरी खिंड' म्हणून ओळखले जाते. विजापूरचा सरदार बहलोलखान याने १५ एप्रिल १६७३ रोजी जत संस्थानातील उमराणी येथे प्रतापराव गुर्जर यांचेकडून झालेल्या संघर्षात (लढाईत) सपाटून मार खाल्ला. पण जीवाच्या अकांडतांडवाने कासावीस झालेल्या खानाने क्षमायाचना केल्याने प्रतापरावांनी त्याला अभय दिला (सोडून दिले). हे वृत्त हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कानावर पडताच ते संपातले आणि लागचीच सेनापतींनी खलिता धाडला की, 'तुम्ही सेनापतीसारखे वागला नाहीत. शिपाईगिरी केलीत! खान घातकी असून वारंवार त्रास देतो. त्यासी गर्दीस मिळवून फत्तेह करणे. नपेक्षा आम्हासी तोंड दाखविणे नाही', पराक्रमाला डिवचणारे आदरयुक्त महाराजांचे शब्द कानावर पडताच प्रतापरावांच्या अंगात सुडरूपी क्रोधांच्या ठिणग्या पेटल्या. विश्वासघातकी खानास कृतघ्नपणाची शिक्षा देण्यास ते ताडकन् उठले, घोडयावर बसले, अन् टाच मारूनी बैभान सुटले. त्यांच्या समवेत विसाजी बल्लाळ, विठ्ठल पिलादेव, सिध्दी दिलाल,कृष्णाजी भास्कर, विठोजी शिंदे, दिपाजी राऊत असे सहा सवंगडी मर्दाने

घोडयावर स्वार झाले आणि नेसरीच्या परिसरात दबा धरून बसलेल्या खानाच्या रोखाने ते सुसाट दौडू लागले. बघता -बघता लाकूडवाडीचा घाट चढून ते नेसरीच्या खिंडीत पोहचले आणि काय हेते आहे हे शत्रूला कळण्यापूर्वीच सात वीर गनिमाच्या सैन्यावर तुटून पडले. दिसेल त्याला कापत सपास् वार करत पुढे सरू लागले. 'महाराज,तुमचा हा कुडतोजी लढता-लढता मेला. आता तो तुम्हाला परत कधीच तोंड दाखविणार नाही. महाराजांना आमचा प्रणाम ! हे शब्द उच्चारत सातही वीर खिंडीत कोसळले. तथापी लढता लढता धारातीर्थी पडले. तो दिवस होता २४ फेब्रुवारी, १६७४ च्या महाशिवरात्रीचा ! महान पराक्रम गाजविणऱ्या या सात वीरांच्या बलीदानातूनच मराठयांच्या पराक्रमी इतिहासाचे एक सुवर्णपान लिहिले गेले.[५] पुढे कवी कुसुमाग्रजांनी प्रतापरावांच्या आत्मबलीदानास 'म्यानातून उसळे तलवारीची पात,वेडात मराठे वीर दौडले सात' या महान काव्यपंक्तीत स्थानबध्द केले. त्यामुळे अफाट पराक्रमाची साक्ष देणाऱ्या नेसरीच्या खिंडीस भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात आजही प्रतापरावांच्या अतुलनिय अशा महान पराक्रमाचे रोमांच उभे रहाते. म्हणून हे स्मारक पर्यटनाचा मानबिंधू ठरत आहे.[६]

३) किल्ले सामानगड

छातीचा कोट करून उज्वल इतिहासाची साक्ष देणारा व छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेला किल्ला म्हणजे सामानगड उन-वारा-पाऊस प्रदुषण यांसारख्या असंख्या नैसर्गिक व मानवनिर्मित संकटांना तोंड देत-देत परिसरातील तेजस्वी इतिहासाच्या परंपेची आठवण करून देत आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासकि जडण-घडणीत गनिमी काव्याची शिकवण देणाऱ्या व सहयाद्रीच्या माथ्यावर दिमाखात उभा असणरा हाच तो सामानगड होय.[७] समुद्रसपाटीपासून ६६५ फूट उंचावर असणाऱ्या या गडाचा इतिहास नेमकेपणाने आढळत नसून तुरळक असाच आढळतो. गडहिंग्लजच्या दक्षिण-पूर्वेला सुमारे १० कि.मी. अंतरावर या गडाबाबत अनेक अख्यायिकाही सांगितल्या जातात. पैकी एक म्हणजे अनेक गडकिल्यांवर गरजेच्यावेळी उपयुक्त असणारे युध्दसाहित्य सुरक्षित व गुप्तपणे ठेवता यावे यासाठी बांधलेला किल्ला म्हणजेच सामानगड होय. गडाची रचना पाहता हा तर्क सत्याच्या जवळ जाणारा वाटतो. काहींच्या मते सदरच्या किल्ला ७ व्या शतकामध्ये राजा दंतीदुर्ग याने बांधला तर काहींच्या मते, शिलाहारवंशीय राजा भोज दुसरा याने १२ व्या शताकात हा किल्ला बांधला. याबाबत (एकूणच) एकमत नसले तरी पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६७६ साली त्याची दुरूस्ती केली होती. याबाबत अभ्यासकांच्यात एकमत दिसते. गडाच्या सभोवताली लाल चिऱ्यांच्या दगडांमध्ये अतिशय मजबूत स्वरूपात बांधलेली भक्क्म तटबंदी, सर्वांचे लक्ष वेधून घेते. या गडावरून दुसऱ्या गडावर जाण्यासाठी असणाऱ्या भुयारी मार्गाचे अस्तीत्व असणाऱ्यार काही खूणा पहावयास मिळतात. गडाचे तट, बुरूज, पायऱ्यांचा उतार, कमानी, युध्दसाहित्य ठेवण्याचे ठिकाण, कैद्यांना डांबून ठेवण्यात येणारी अंधारकोठडी,यासारखी बांधकामे मनाला थक्क करणारी आहेत. सभोवताली पसरलेली दाट झाडी,अनेक कप्प्यांच्या विहिरी व त्यातील मुबलक पाणी, मारूती मंदिर, भवानीमातेचे मंदिर, भिमशाप्पाची समाधी आणि गडकऱ्यांनी केलेले बंड ही सामानगडाची खास वैशिष्ट्ये आहेत.[८]

४) क्रांतीकारकांचे गाव (नूल)

गडहिंग्लजच्या पर्यटनाचे मुख्य वैशिष्टये म्हणजे नूल नावाच्या एकाच गावाने भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी स्वत:ला झोकून देणारे सत्तावीस क्रांतीकारक दिले होते. त्यामध्ये अनंतरावजी तेलवेकर,शंकरराव चव्हाण, आंनदराव चव्हाण, तुकाराम चव्हाण, पराप्पा आरबोळे, दुंडाप्पा चौगुले,रामचंद्र काळे, मारूती चव्हाण, रामू नागरे,परशुराम पोवार, बाबुराव देसाई,शंकरराव वाली, आप्पा शिंदे, सदाशिव शिंदे,मारूती कांबळे,आण्णाप्पा नायकवडी, बसवाणी गड्डी,नानासो शिंदे,रामू चौगुले, बसाप्पा चौगलु, नारायण शिंदे,यशवंत यादव,गौस सनदी, हसन सनदी, हसन अत्तार, रामराव जाधव, दत्तात्रय पाटील यांचा समावेश होतो. त्यांच्या महान कार्यामुळेच भारतच्या स्वातंत्रलढयातील नूल गावाचे क्रांतीकार्य सर्वश्रुत आहे. आज ही पर्यटक म्हणून त्यांच्या कार्याचा आढावा घेताना नूल हे क्रांतीकारकांचे गाव असल्याचा मनापासून गर्व वाटतो.[९]

५) विलोभनीय दर्शन देणारा गुडडाईचा डोंगर

गडहिंग्लज शहरापासून केवळ दोन किलोमीटर अंतरावर वसलेला भडगाचे ग्राम दैवत म्हणजेच गुड्डाईचा डोंगर होय. उंच डोंगरावर असलेल्या या देवस्थनाची व्याती डोंगराप्रमाणेच दुरवर पसलेली आहे. याचे खास वैशिष्टये म्हणजे पर्यटकांना या डोंगरावरून सूर्योदय आणि सूर्योस्त ही पाहता येतो. कन्नड भाषेत गुड्ड म्हणजे डोंगर होय. तर डोंगरात बसलेली देवी म्हणून तीला गुडडा देवी किंवा गुड्डाई म्हणून ओळखले जाते. पूर्वीच्या काळी साथीच्या रोगांचा बराच फैलाव

गडहिंग्लज परिसरात झाला होता. त्यात अनेकांचा मृत्यूही झाला होता. पण भडगावातील या देवीच्या वास्तव्याने आजाराचा फैलाव तर झालाच नाही. पण कोणाचा मृत्यूही झाला नाही. या भावनेतून या देवीची जागृती देवस्थान म्हणून ख्याती झाली तेव्हापासून नित्य नियमाने तिची पूजा केली जाते. दर वर्षी मे महिन्यात मोठी यात्रा बरविण्याची ही परंपरा ही सुरू झाली. हिरव्या गर्द झाडांनी आच्छादलेल्या या डोंगरावरून गडहिंग्लज परिसराचे अत्यंत विलोभनीय व देखणे दर्शन पर्यटकांने घेता येते.[१०]

६) इंचनाळचे श्री. गणेश मंदिर :

हिरण्यकेशी नदीच्याकाठावर बसलेल्या इंचनाळ येथील पेशवेकालीन गणेश मंदिर पर्यटकांचे केंद्र बिंदू ठरले आहे. हे मंदीर ३५० वर्षापूवीचे असल्याचा उल्लेख शिलालेखातून मिळतो. मंदिराची रचना,गाभारा,सभामंडप,नगरखाना,अशा स्वरूपाचे आहे. दरवर्षातील फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात सात दिवस सूर्याची किरणे गाभाऱ्यातील गणेश मूर्तीवर पडतात. हे मंदिर बांधकाम शैलीचे खास वैशिठ्ये होय. काळया पाषाणात कोरलेली गणेशमूर्ती विलोभनीय स्वरूपाची आहे. चर्तुभूज असणाऱ्या मूर्तीच्या डाव्या हातात अकुंश तर उजवा हात वरदहस्त स्वरूपात आहे. पुराणातील २१ गणेशापैकी ही एकवीसावी मूर्ती आहे. त्यामुळे विविध ठिकाणी असणाऱ्या २० स्थळांच्या दर्शनानंतर भविक या ठिकाणी दर्शनास येतात. वीस ठिकाणी दर्शन घेतल्याचे पुण्य येथील गणेश दर्शनाने मिळते. अशी भविकांची भावना दंतकथा पिढयानपिढया चालत आली आहे.[११] मंदिराच्या चौकटीवर १७७३ चा उल्लेख असून १०० रू खर्च झाल्याचा उल्लेख मिळतो शिवाय १९०७ मध्ये गोपाळ कुलकर्णी यांनी मंदिराचा प्रथम जिर्णोध्दार केल्याचीही नोंद मिळते. कर्नाटकातील लाल रंगाच्या दगडामध्ये सध्याच्या मंदिराचे बांधकाम १९८७ ते १९९२ याकाळात करण्यात आले. नवरात्रीच्या काळात येथे ९ दिवस उत्सव भरवीला जातो. दिवाळीत पालकीची मिरवणूक तर संकष्टीला यात्रेचे स्वरूप प्राप्त होते हा गणेश नवसाला पावणारा आहे. अशी ख्याती असल्याने मंदिराकडे बारा ही महिने भावीकांचा ओढा पाहावयास मिळतो.[१२]

ऐतिहासिक पर्यटनाच्या संवर्धनाचे जळजळीत वास्तव

जगातील कोणत्याही देशातील, देशाच्या राज्यातील, राज्याच्या जिल्हातील, जिल्हाच्या तालुक्यातील, अन् तालुक्याच्या गावातील ऐतिहासिक वास्तू या पूर्वजांनी गाजवलेल्या विविध क्षेत्रातील पराक्रमांची व कर्तृत्वाची प्रतिके असून त्याच वास्तू भावी पिढयांच्या मार्गदर्शक असतात. पण उज्वल इतिहासाचा वारसा सांगणाऱ्या याच ऐतिहासिक वास्तूंचे ज्या पद्धतीने संवर्धन व्हायला हवे त्यापद्धतीने होताना दिसत नाही हेच पर्यटनाच्या संवर्धनाचे जळजळीत वास्तव आहे. उदाहरण दयायचेच झाले तर शेकडो वर्षापासून अत्यंत दिमाखात महाराष्ट्राच्या उज्वल व महान पराक्रमांची साक्ष देत उभ्या असलेल्या बहुतांशी सर्वच ऐतिहासिक वास्तू आज मात्र चोरून-चोरून केलेल्या प्रेमांची, धन - दांडग्यांच्या पोरा-पोरींनी केलेल्या पाटर्यांची, परकीय संस्कृतीचे अणुकरन केल्याल्या विविध चिन्हांची, प्रसिध्दी हपापलेल्यांच्या नावांची, मोठया प्रमाणात तोडून नेहलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीची, ओळख लपविण्यासाठी तोंडावर रूमाल बांधून राजरोसपने नको ते काळे धंदे करता येणाऱ्या ठिकानाची, आणि स्वत:च्या स्वार्थासाठी चोरून नेलेल्या पण अनमोल असलेल्या दगड-धोंडयांच्या भकास खानाखुनांची साक्ष देताना दिसतात. महाराष्ट्राला मोठा इतिहास लाभला आहे. हा इतिहासच खऱ्या ज्याचा इतिहास उज्वल आहे त्याचे भविष्यही तितकेच उज्वल आणि स्फुर्तीदायी असते असा इतिहासाचा दाखला आहे. पण सध्या त्याच इतिहासाचे, त्यांच्या खानाखुनांचे स्मरण केवळ रूढी व परंपरा म्हणूनच होताना दिसते आहे याच्या मनाला प्रचंड वेदना होतात.

म्हणून आपल्या उज्वल इतिहासाचा हा ऐतिहासिक वारसा जर आपण आसाच ऱ्हास पावू दिला तर एक दिवस हाच उज्वल महाराष्ट्र (पर्यायाने देश) ऐतिहासकि वास्तूंशिवाय पहाण्याचे दूर्भाग्य पुढील पिढयांच्या नशिबी आल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच आजच्या समाजाने, तरूण पिढीने, पर्यायाने प्रत्येक जनाणे भविष्यातील पाऊल टाकत असताना आपल्या गौरवशाली इतिहासाच्या पाऊल - खुनांचे (वास्तुंचे) संवर्धन करूनच टाकले पाहिजे. तरच मागच्या पिढयांचा उज्वल ऐतिहासिक वारसा विदयमान पिढीकडून भविष्यातील पिढयांना मिळत राहील. तेंव्हा ऐतिहासिक वारसा स्थळांचा विकास व संवर्धन करून देशाच्या विकासाचे चाक अधिक गतीमान करायचे की भविष्यातील पर्यटकांना ऐतिहासिक वास्तूंचे भग्न झालेले अवशेष (अश्रू) पाहु दयायचे हे आपणच ठरवायचे .....!

समारोप :

महान पराक्रमाच्या इतिहासाची साक्ष देणारी वारसास्थळे हे गडहिंग्जच्या ऐतिहासकि पर्यटनाचे खास वैशिष्टये होय.कोल्हापूर जिल्हयाच्या पर्यटनास वेगळा साज देण्याची भूमिका गडहिंग्लजच्या पर्यटनाने निभावली आहे. निसर्गाचे सुंदर वरदान लाभलेल्या हिरव्यागार जंगल झाडांनी आच्छादलेल्या पर्यावरणाचा समतोल असणाऱ्या, परीवर्तनाच्या क्रांतीला जन्म देणाऱ्या, दरडोई उत्पन्नात अग्रेसर असणाऱ्या उज्ज्वल इतिहासाचा वारसा सांगणाऱ्या आणि पवित्र नदीच्या काठी वसलेल्या अशा विविध पैलूनी हा परिसर ओळखला जातो. त्यामुळे संपूर्ण भारताच्या पर्यटनरूपी नकाशावर गडहिंग्लजच्या पर्यटनाने स्वातंत्र ओळख निर्माण केली आहे. लाखो भक्तांचे भविकांचे भक्तीपीठ ओळखले जाणारे श्री.काळभैरव मंदिर, मराठयाच्या काळात युध्द साहित्य पोटात घेवून शत्रूंची शेकडो आक्रमाणे झेलत स्वराज्याचे रक्षण करणार सामानगड, स्वराज्यवरील प्रेम व निष्ठा ठेवताना प्राण्याचे बलिदान देणाऱ्या प्रतापरव गुर्जर यांचे स्मारक,आपल्यामाथ्यावरून लाखो पर्यटकांना विलोभनीय दर्शन देण्यास सदैव तयार असणारा गुड्डाईचा डोंगर,मराठे काळातील इतिहासाचा दाखला देणारे इंचनाळचे गणेश मंदिर,ज्ञानाच्या बळावर या मातीची जगास ओळख करून देणारे थोर शिक्षणतज्ञ डॉ. जे.पी. नाईक यांचे जन्मगांव आणि भारताच्या स्वातंत्र लढयात २७ क्रांतीवीरानी प्रत्यक्ष सहभाग घेवून भारताच्या नकाशावर कर्तुत्वाची मुद्रा उमटवणारे नूल हे गाव. अशी अनेक पवित्र स्थळे गडहिंग्लच्या पर्यटनाची मानबिंदू ठरली आहेत यात शंका नाही

संदर्भसूची :

१) सुधाकर गोकाककर (संपादक), हिरण्यकेशीच्या काठी, गडहिंग्लज नगरपरिषद शताब्धी स्मृतीग्रंथ (१८८७ ते १९८७), १९८७ पान नं.४,५
२) मुलाखत,श्री.गुरव (पुजारी) काळभैरी मंदिर,गडहिंग्लज दिनांक ०९/०८/२०१५.
३) दैनिक सकाळ, गडहिंग्लज कार्यालय वर्धापन दिन,विशेषांक, दिनांक ३०/११/२००५ .
४) सुरेश चव्हाण -सुवास नाईक , इतिहास लेखानातील नवा प्रवाह : प्रादेशीक इतिहास, विद्यावती प्रकाशन लातूर, २०१५,पान नं १४९.
५) दैनिक तरूण भारत,गडहिंग्लज पर्यटन विशेष पुरवणी, दिनांक ०५/०६/२०१६.
६) दैनिक सकाळ,गडहिंग्लज विभागीय कार्यलय वर्धापन दिन विशेषांक ३०/११/२०१६.
७)सुधारक गोकाकर, हिरण्यमयी, पूज्य सानेगुरूजी वाचनायल आयोजित. मराठी साहित्य संमलेन स्मरणीका, २००७.
८) दैनिक सकाळ, पर्यटन विशेष पुरवणी, २१/०७/२०१३.
९) अमृतकुंभ,नुतन भारत वाचनालय, अमृत महोत्सवी वर्षे स्मरणिका, नूल (१९३४ ते २००९)
१०) दैनिक सकाळ, गडहिंग्लज कार्यालय वर्धापन दिन,विशेषांक दिनांक ३०/११/२००५.
११) कित्ता,
१२) मुलाखत - श्री.गुरव (इंचनाळ), दिनांक १०/०८/२०१४.